# बृहन्मुंबई महानगरपालिका

*सार्वजनिक आरोग्य खाते / किटकनाशक विभाग, किटक नियंत्रण अधिकारी 'बी' विभाग.*

*किटक नियंत्रण अधिकारी, एम.सी.जी.एम. बी विभाग कार्यालय, रूम न. १२, पहिला मजला, बाबुला टँक क्रॉस रोड, मुंबई- ४०० ००९.*

**क्रमांक : किनिअ / बी / १०९० /एस आर. दिनांक :- ०५.०३.२०२०.**

विषय:- किटक नियंत्रण अधिकारी 'बी' विभागात बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता ७ महिन्यांच्या कालावधीसाठी तसेच पावसाळी मोसमात ६ महिन्यांच्या कालावधीसाठी डेंगी, मलेरिया नियंत्रणाकरिता स्वयंसेवक उपलब्ध करण्यासाठी वृत्तपत्र व मनपा संकेत स्थळावर जाहिरातीद्वारे अर्ज मागवून सूचना देण्याकरिता.

प्रस्तावना:

किटकनाशक विभागामार्फत संपूर्ण बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मलेरिया /डेंगी पसरविणा-या डासांच्या नियंत्रणाकरिता बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता एप्रिल ते ओक्तोंबर ७ महिन्यांच्या कालावधीकरिता व पावसाळी मोसमातील जून ते नोव्हेंबर ह्या ६ महिन्यांच्या कालावधीकरिता किटक नियंत्रण अधिकारी ए ते टी विभागात बेरोजगार व सहकारी सेवा संस्थांकडून मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी सूचना पत्रान्वये यशस्वी अर्जदार संस्थांना उपायुक्त (परि-१) यांची मंजूरी क्र. एमडीबी /१०५. दि. १०.०४.२०१९ अन्वंये (प्रत पृष्ठ क्र.प.- ते प.- )आणि क्र. एमडीबी / ३१०३. दि. १९.०९.२०१९ अन्वंये किमान वेतन दर अधिक ४६% लेव्ही (प्रतिपूर्ती सापेक्ष) या दराने कंत्राट करण्यास मंजूरी प्राप्त झाली. (प्रत पृष्ठ क्र.प- ते प- ) परिपत्रक्र क्र. प्रकाअ/६४ दि.३०.०४.२०११ अन्वंये व सद्यःस्थितीत प्रमुख कामगार अधिकारी यांच्या **परिपत्रक क्र.प्रकाअ/७ दि. १३.०९.२०१९ अन्वये किमान वेतन दर रु. ६२५.३८ प्रतिदिन प्रती स्वयंसेवक असा आहे. (प्रत पृष्ठ क्र.प- ते प- )**सदर यशस्वी अर्जदार संस्थांना शासनाच्या धोरणानुसार व प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये किमान वेतन दर + ४६% लेव्ही या निश्चित दराने अधिदान करण्यात येत आहे.

उपरोक्त कंत्राटाचा कालावधी दि. ३१.०३.२०२० रोजी समाप्त होणार आहे. वर नमूद केल्याप्रमाणे ए ते टी विभागात किटकनाशक कार्यालयाद्वारे सोडत पध्दतीने सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना स्वयंसेवक पुरविण्याकरिता कंत्राट देण्यात आले होते. सदर कार्यपध्दतीचे विकेद्रीकरण करण्याकरिता किटकनाशक कार्यालयाद्वारे अति.आयुक्त (प.उप.) यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास अति.आयुक्त (प.उप.) यांची क्र.अतिआ/पउ/६५१२/एच दि. ०९.१०.२०१८ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे (पृष्ठ क्र.प- ते प- ). या मंजूरीनुसार स्वयंसेवक पुरविण्याकरिता प्रत्येक विभागात किटकनियंत्रण अधिका-यानी सूचनापत्राद्वारे जाहिरात देऊन तदनंतर पात्र संस्थानमधून सोडत काढून सहकारी संस्थेकडून / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडून स्वयंसेवक पुरविण्याकरिताची कार्यपध्दती पूर्णत्वास न्यावयाची आहे.

'बी' विभागात सध्या एकंदर **२२ (बावीस)** इमारत बांधकामे सुरु आहेत, त्यातील बरीचशी बांधकामे मनोरे (Towers) स्वरुपाची आहेत. या सर्व बांधकामांच्या ठिकाणी इमारत बांधकाम घट्ट होण्यासाठी (Curing) साठवून ठेवलेल्या पाण्यात व पावसाळयादरम्यान साचणा-या पाण्यात मलेरिया पसरविणा-या ॲनॉफेलिस डासांची उत्पत्ती होऊ नये याकरिता प्रत्येक आठवडयाला डास अळीनाशक फवारणी करणे अत्यंत गरजेचे आहे. सदर फवारणी होऊ न शकल्यास आठ दिवसात मलेरिया पसरविणा-या ॲनॉफेलिस डासांची उत्पत्ती होऊन मलेरियाग्रस्त भागातून आलेल्या बाधित इमारत बांधकाम मजुरांच्या शरीरातील मलेरियाच्या जंतूंचा प्रसार सदर डासामार्फत आजुबाजूच्या वस्तीतील अन्य नागरिकांना होऊन मलेरियाचा उद्रेक होऊ शकतो. तसेच पावसाळयादरम्यान सद्यःस्थितीत असलेल्या झोपडपट्टी विभागातील एडिस डासांच्या

...२...



नियंत्रणाकरिता या झोपडपट्टीतील टायर्स, पाण्याची पिंपे, फुलदाण्या, अनावश्यक भंगार सामान (ऑड आर्टिकल्स) इत्यादी उत्पत्तीस्थळांची नियमित तपासणी करणे व आवश्यक तेथे किटकनाशक फवारणी करणे अत्यंत गरजेचे आहे.

येथे असे नमूद करण्यात येते की, निवड झालेल्या संस्थेला शासनाच्या धोरणानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाअन्वये नमूद किमान वेतन दर अधिक ४६% लेव्ही या निश्चित दराने अधिदान करण्यात येणार असल्याने सदर कामाकरिता ई-निविदा मागवून लघुत्तम दराबाबतचा
कोणताही हेतू साध्य होणार नसल्याने, ई-निविदा न मागविता संकेतस्थळावर सूचनापत्र देऊन अर्ज मागविणे उचित होईल.

प्रस्ताव:-

अतएव किटक नियंत्रण अधिकारी बी विभागात मलेरिया / डेंगी / चिकुनगुनिया इत्यादी आजार पसरविणा-या डासांच्या नियंत्रणाकरिता बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता संस्थांना कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून पुढील ७ महिन्यांच्या कालावधीसाठी पृष्ठ क्र. प- ---- वरील परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविल्यानुसार

आवश्यक स्वयंसेवक उपलब्ध करुन घेण्यासाठी तसेच पावसाळयात **(जून ते नोव्हेंबर)** या ६ महिन्यांसाठी मलेरिया व डेंगी प्रसारास पोषक असल्यामुळे, डेंगी नियंत्रणाकरिता अशा एकूण ६ महिन्यांसाठी परिशिष्ट 'ब' मध्ये दर्शविल्यानुसार किटक नियंत्रण अधिकारी 'बी' विभागात आवश्यक अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी सार्वजनिक वृत्तपत्रात आणि मनपा संकेत स्थळावर जाहिरातीव्दारे सूचना देऊन अर्ज मागविण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे. प्राप्त अर्जांमधून पात्र संस्थांची विभागवार सोडत काढून प्रथम, व्दितीय व तृतीय अशा तीन संस्थांची निवड करुन त्यापैकी प्रथम क्रमांकावरील संस्थेस नियमानुसार अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतर कंत्राटाचे काम देण्यात येईल.

सदर अळीनाशक फवारणीच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे –

| **कालावधी:** | **७ महिन्यांकरिता (कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून ७ महिन्यांसाठी) आवश्यक मनुष्यबळ** | **६ महिन्यांकरिता (जून ते नोव्हेंबर ) आवश्यक मनुष्यबळ** |
|---|---|---|
| **कामाचा तपशील:** | विभागातील सर्व बांधकामांच्या ठिकाणी इमारत बांधकाम घट्ट होण्यासाठी साठवून ठेवलेल्या पाण्यात व पावसाळया दरम्यान साचणा-या पाण्यात मलेरिया पसरविणा-या ॲनॉफेलिस डासांची उत्पत्ती होऊ नये याकरीता प्रत्येक आठवडयाला डास अळीनाशक फवारणी करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे इमारत बांधकामांच्या आजुबाजूच्या परिसरात किटकनाशक फवारणी करणे आवश्यक आहे. सबब इमारत बांधकामांची संख्या विचारात घेऊन स्वयंसेवकांची संख्या ठरविण्यात आलेली आहे. | मलेरिया / डेंगी नियंत्रणाकरिता घरांच्या / झोपडयांच्या छप्परांवर ठेवण्यात आलेले टायर्स, अनावश्यक भंगार सामान (ऑड आर्टीकल्स) इत्यादी ठिकाणी तपासणी करुन व ते निष्कासित करुन आवश्यकतेनुसार अळीनाशके टाकणे व दैनंदिन कामांबरोबर डासउत्पत्तीस्थाने नष्ट करणे. पावसाळयात प्रत्येक कनिष्ठ अवेक्षकाच्या कार्यक्षेत्रात पाणी साचणारी उत्पत्तीस्थाने, त्यावर करावयास लागणारी किटकनाशक फवारणी, डेंगी रुग्णाची संख्या तसेच त्या विभागातील कार्यक्षेत्र याचा विचार करुन स्वयंसेवकाची संख्या ठरविण्यात आलेली आहे. |

- **कराराचा कालावधी** - कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून **७ महिन्यांसाठी** ( १६८ दिवस ) व पावसाळी मोसमातील (जून ते नोव्हेंबर) या **६ महिन्यांकरिता** (१४५ दिवस) मलेरिया/डेंगी पारेषण काळासाठी अंतर्भूत).
- **अधिदानाचा दर** – (१) शासन धोरणानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील किमान वेतन दर (प्रतिदिन प्रती स्वयंसेवक) अधिक ४६% लेव्हीचे अधिदान परिपत्रक क्र.प्रकाअ/६४ दि.३०.०४.२०११ मधील अटींच्या पूर्ततेनंतर करणे (पृष्ठ क्र.प----). ...३...

**...३...**

(२) क्र.प्रकाअ/४ दि.३१.०८.२०१८ अन्वये किमान वेतन दर रु.५८०.९६ प्रतिदिन प्रती स्वयंसेवक असा आहे (पृष्ठ क्र.प-----).

(३) क्र. प्रकाअ /०१ दि. १८.०४.२०१९ अन्वये किमान वेतन दर रु.६०५.१९ प्रतिदिन प्रती स्वयंसेवक असा आहे. (पृष्ठ क्र. प.- ते प.- - )

(४)सद्यःस्थितीत प्रमुख कामगार अधिकारी यांच्या परिपत्रक क्र.प्रकाअ/७ दि.१३.०९.२०१९ अन्वये किमान वेतन दर रु.६२५.३८ प्रतिदिन प्रती स्वयंसेवक असा आहे. (पृष्ठ क्र.प-.......

अळीनाशक फवारणीकरिताची आवश्यक साधने व सुरक्षा साधने परिशिष्ट 'ब' वर आहे (पृष्ठ क्र.प........)

**अटी व शर्ती**

**अ) अर्ज सादरीकरण :**

१. अर्जदार संस्थेने परिशिष्ट 'फ' मध्ये नमूद केलेल्या अर्जाची रक्कम, किटक नियंत्रण अधिकारी 'बी' कार्यालयाद्वारे चलन प्राप्त करुन नागरी सुविधा केंद्रावर भरणा केल्यानंतर संस्थेच्या मुखपत्रावर (Letter Head) परिशिष्ट 'क' प्रमाणे मूळ प्रतीत किटक नियंत्रण अधिकारी 'बी' विभाग यांच्या सूचनापत्रामधील दिलेल्या कार्यालयीन पत्त्यावर अर्ज सादर करावा. सदर भरणा केलेल्या पावतीची छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल.

२. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था ही द महाराष्ट्र को-ऑप. सोसायटी ॲक्ट १९६० या कायदयाने स्थापन झालेली नोंदणीकृत संस्था असल्याबाबतची उप निबंधक / सहायक निबंधक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल.

३. अर्जदार सहकारी संस्था/ बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागात नेमून दिलेल्या कामाकरिता स्वयंसेवक पुरविण्याचा मागील सात वर्षात (माहे एप्रिल २०१२ नंतर) कमीत कमी दोन वर्षांचा अनुभव असलेल्या विविध खाते प्रमुखांच्या विविध कालावधींच्या साक्षांकित छायांकित प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक असेल. त्यासोबत अनुभव दर्शविणा-या कार्यदेशांच्या साक्षांकित छायांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक असेल.

४. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण तरतूदी अधिनियम १९५२ कायदयाअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे

आवश्यक असेल. तसेच पुरविण्यात येणा-या स्वयंसेवकांच्या बाबतीत या अधिनियमाखाली आवश्यक तो निधी संबंधित शासकीय कार्यालयात वेळोवेळी जमा करणेबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील व त्याच्या प्रतिपूर्तीसापेक्ष त्याचे अधिदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

५. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे राज्य कामगार विमा योजना (ई.एस.आय.सी. ॲक्ट १९४८) कायद्याअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल. तसेच पुरविण्यात येणा-या स्वयंसेवकांच्या बाबतीत या अधिनियमाखाली आवश्यक तो निधी संबंधित शासकीय कार्यालयात प्रत्येक महिन्यात जमा करणेबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील व त्याच्या प्रतिपूर्तीसापेक्ष त्याचे अधिदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

६. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकक्षेत किटकनाशक हाताळणी करणे यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या किटकनाशक कायदा १९६८ अधिनियम ४६ सोबत किटकनाशक नियम १९७१ चा नियम १० अन्वये आवश्यक असणा-या वैध परवान्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत जोडणे बंधनकारक असेल.

...४...



७. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांची सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या दोन वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल ही परिशिष्ट ‘फ’ प्रमाणे देण्यात आलेल्या एकूण कंत्राट रकमेच्या (किमान वेतन दर अधिक ४६% लेव्ही) ३०% रकमेइतकी असणे आवश्यक आहे. सन २०१७-१८, २०१८-१९ या दोन आर्थिक वर्षांचे ताळेबंद अहवाल व **वार्षिक उलाढाली बाबत सनदी लेखापालांच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल.**

८. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था परिशिष्ट ‘फ’ प्रमाणे देण्यात आलेल्या एकूण कंत्राट रकमेनुसार अधिकृत बँकेच्या आवश्यक पतपत्राची मूळ प्रत जोडणे आवश्यक असेल. अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून अगोदरच्या सहा महिन्यांच्या कालावधीतील पतपत्र (Letter of Solvency) वैध धरण्यात येईल.

९. अर्जदाराने शासनाच्या अधिकृत प्राधिकरणाने योग्य त्या नमुन्यात दिलेल्या वस्तू व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्राची (GST Registration) साक्षांकित छायांकित प्रत देणे आवश्यक आहे. संस्थेच्या एकूण उलाढालीनुसार संस्थेस वस्तू व सेवाकर नोंदणी करणे आवश्यक नसल्यास तसे प्रमाणपत्र संस्थेच्या मुखपृष्ठावर संस्थाचालकाने देणे बंधनकारक असेल.

१०. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे अर्ज सादर करताना संस्थेच्या नावाचे पॅन कार्ड सोबत जोडणे आवश्यक असेल.

११. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेचे आर्थिक व्यवहार असलेले बँकेचे नांव व खाते क्र.असलेल्या बँकेच्या खातेपुस्तिकेची साक्षांकित छायांकित प्रत देणे सोबत जोडणे आवश्यक असेल.

१२. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे अर्ज सादर करताना परिशिष्ट 'ड' प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु.५००/- किंमतीच्या मुद्रांकीत कागदपत्रावर (Stamp paper) हमी पत्र देणे आवश्यक असेल.

१३. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेची उपविधी / घटना याची साक्षांकित छायांकित प्रत देणे आवश्यक आहे.

**ब) <u>अर्ज पडताळणी</u> :**

१. अर्जदार संस्थांनी सूचनापत्र सार्वजनिक वृत्तपत्र व मनपा संकेत स्थळावर प्रकाशित केल्यापासून ०४ (चार) दिवसांच्या आत लेखी पत्राद्वारे सूचना कराव्यात. अर्जदार संस्थांनी केलेल्या केवळ त्या सूचनांची दखल घेण्यात येईल.

२. ज्या अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना किटकनाशक विभागाने यापूर्वी काळया यादीत टाकले असेल किंवा ज्या संस्थेचे काम समाधानकारक नाही म्हणून त्यांना काढून टाकले असेल अशा संस्थांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३. एखाद्या संस्थेस आपल्या प्रतिस्पर्धी संस्थेबाबत त्याने कागदपत्रे/माहिती/किंवा सादर केलेल्या इतर कागदपत्रांबाबत तक्रार असल्यास त्यांच्या पडताळणीकरिता रु.२५,०००/- (रु.पंचवीस हजार फक्त) इतकी रक्कम महानगरपालिकेच्या तिजोरीत अगोदर भरणा करणे आवश्यक आहे. जर सदर संस्थेने केलेली तक्रार असत्य व अयोग्य आढळल्यास सदर तक्रारदार संस्थेची रु.२५,०००/- परतावा रक्कम जप्त केली जाईल. तसेच जर तक्रार सत्य व योग्य असेल तर ज्या संस्थेबाबत तक्रार असेल त्या संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल व रु.२५,०००/- दंड व ५ वर्षाकरिता काळया यादीत टाकले जाईल.

४. अर्जदार संस्थांनी सादर केलेली कागदपत्रे पडताळणी अधिकारी / कर्मचारी आवश्यकता वाटल्यास त्याची शहानिशा करु शकतील. सदर कागदपत्रे चुकीची किंवा खोटी आढळल्यास सदर संस्थेचा अर्ज अपात्र

ठरविण्यात येईल व रु.१०,०००/- इतका दंड व ५ वर्षांकरिता काळया यादीत टाकले जाईल.

...५...

...५...

५. पडताळणी दरम्यान न जोडलेल्या आवश्यक कागदपत्रांची ई-मेलद्वारे दोन दिवसात पूर्तता करण्यास अर्जदार संस्थेस कळविले जाईल. पूर्तता न केल्यास सदर संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत विहित मुदतीनंतर संस्थांची कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. अर्जदार सादर केलेली कागदपत्रे परत करण्यात येणार नाहीत.

६. पडताळणी दरम्यान संस्थाचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी पडताळणी कर्मचारी किंवा [illegible] यांच्याशी कसल्याही प्रकारे संपर्क साधू नये. तसेच कसल्याही प्रकारचे दबाव तंत्र वापरल्यास सदर संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७. अर्जदार संस्थाच्या केवळ लेखी सूचनांची दखल घेण्यात येईल.

८. पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र ठरलेल्या संस्थांना ई-मेलद्वारे सोडतीचा दिनांक, वेळ व ठिकाण कळविण्यात येईल. अपात्र संस्थांची यादी किटक नियंत्रण अधिकारी यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

**क) <u>संस्था निवडीकरीता अर्जांची सोडत</u> :**

१. सोडती दरम्यान, संस्थाचालक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनाच प्रवेश दिला जाईल. अधिकृत प्रतिनिधींकरिता संस्थाचालकांचे अधिकार पत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. अर्ज प्राप्त झाल्यानंतर सर्व अटी व शर्ती पूर्ण करणा-या पात्र अर्जदार संस्थांमधून सोडत काढण्यात [illegible]

३. जर अर्ज प्राप्त झाले नसतील तर पुनश्चः सात दिवसांचा कालावधी देऊन सूचनापत्राद्वारे अर्ज मागविण्यात येतील. तरीदेखील प्रतिसाद न मिळाल्यास किटक नियंत्रण अधिकारी 'बी' विभाग हे सहायक आयुक्त 'बी' विभाग व उपायुक्त परिमंडळ - १यांच्या मंजुरी अन्वये त्या विभागातील परिरक्षण अथवा घनकचरा व्यवस्थापन खात्यातील कार्यरत स्वयंसेवक पुरविणा-या संस्थांकडून संमती पत्र घेऊन नेमणूक करतील.

**ड) <u>निवड पश्चात</u> :**

१. सोडतीमध्ये प्रथम क्रमांकावरील असलेल्या संस्थेची नेमणूक करण्यात येईल.व्दितीय व तृतीय क्रमांकावरील संस्थांना प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात येईल.

२. निवड झालेल्या संस्थेने काम करण्याचे नाकारल्यास सोडतीमधील प्रतिक्षा यादीवरील द्वितीय क्रमांकाच्या संस्थेस संमती पत्र घेऊन नेमणूक करण्यात येईल.

३. व्दितीय क्रमांकाच्या संस्थेने सुध्दा काम करण्याचे नाकारल्यास सोडतीमधील प्रतिक्षा यादीवरील तृ[illegible] क्रमांकाच्या संस्थेस संमती पत्र घेऊन नेमणूक करण्यात येईल.

४. एका संस्थेला नेमून दिलेले ठराविक काम ती संस्था दुस-या संस्थेला पुनर्वाटप करुन देऊ शकणार [illegible] केल्यास अशा संस्थेला महापालिकेतर्फे दिलेले कंत्राट त्वरित रद्द करण्यात येईल व त्या संस्थेस काळया यादीत टाकण्यात येईल. तसेच प्रतिक्षा यादीवरील द्वितीय क्रमांकावर असलेल्या [illegible] नेमणूक करण्यात येईल.

५. निवड झालेल्या संस्थेस आवश्यक ते विधी शुल्क, साधन साहित्य आकार आणि दस्तऐवजावर स्टॅम्प डयुटी, सुरक्षा अनामत रक्कम बँक हमीपत्राच्या स्वरुपात भरल्यास त्यावर स्टॅम्प डयुटी रक्कम व प्रसंगानुरुप जे-जे अनुज्ञेय असेल ते त्या-त्या वेळी अदा करणे बंधनकारक असेल.

६. नियुक्त केलेल्या संस्थेने नियुक्ती दिनांकापासून ३० दिवसात करार रकमेच्या २% रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणे आवश्यक आहे..

७. निवड झालेल्या सहकारी संस्थेने / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने कार्यादेश प्राप्त झाल्यावर आवश्यक स्वयंसेवक पुरविताना ते स्वयंसेवक त्या संस्थेचे सभासद असल्याबाबतचे प्रमाणपत्र संस्थेच्या

...६...

...६...

मुखपत्रावर (Letter Head) देणे बंधनकारक राहील. सदर सभासदांची संपूर्ण नावे, कायमचा पत्ता, छायाचित्र व बँक पासबुकची छायांकित प्रत किटक नियंत्रण अधिकारी यांना सादर करणे आवश्यक असेल.

८. नियुक्त अर्जदार सहकारी संस्थेने /बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने महापालिकेबरोबर महापालिका अधिनियम १८८८ कलम ७०(१)(ब) नुसार लिखित करार करणे बंधनकारक असेल. कराराबाबत भविष्यात काही वाद उदभवल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय हा मान. महानगरपालिका आयुक्तांचा असेल.

९. संस्थेची निवड झाल्यानंतर कंत्राट करार होण्यापूर्वी जर असे निदर्शनास आले की, संस्थेनी अर्जा सोबत दिलेली माहिती व कागदपत्रे ही खोटी किंवा चुकीची आहेत, तर सदर संस्थेस ५ वर्षांकरिता काळया यादीत टाकले जाईल व ते काम सोडती मधील पुढील दुस-या क्रमांकाच्या संस्थेस

देण्यात येईल. कंत्राट करार निष्पादित झाला असल्यास देखील सदर कंत्राट रद्द करण्यात येईल व वरील प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**ई) <u>सर्वसाधारण</u> :**

१. निवड झालेल्या सहकारी संस्थेकडून / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडून किटकनाशक फवारणीकरिता नेमण्यात आलेल्या प्रत्येक स्वयंसेवकास शासन निर्देशानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांचेकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या परिपत्रक क्र.प्रकाअ/६४ दि.३०.०४.२०११ नुसार अनुज्ञेय किमान वेतन अधिक ४६% लेव्हीचे अधिदान परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेसापेक्ष करावयाचे आहे.

२. ४६% लेव्हीमध्ये भविष्य निर्वाह निधी १२%, कामगार विमा ४%, सानुग्रह अनुदान ८.३३%, रजेचे रोखीकरण ६% व सणांच्या रजा व किरकोळ रजेचे रोखीकरण १%, उपदान ४%, किरकोळ रक्कम १.६७% व प्रशासकीय खर्च ५% तसेच सुरक्षितता साधने ४% या बाबींचा समावेश आहे.

३. निवड झालेल्या सहकारी संस्थेने / बेरोजगार सेवा सहकारी संस्थाचालकाने परिपूर्ण मासिक देयके प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत किटक नियंत्रण अधिकारी 'बी ' विभागात सादर करावीत. तसेच सदर संस्थाचालकाने महानगरपालिकेस सादर केलेल्या देयकांचे अधिदान मुंबई महानगरपालिकेकडून होण्यावर अवलंबून न राहता, प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत कर्षित धनादेश / ECS /RTGS / NEFT द्वारे स्वयंसेवकांना पूर्ण अधिदान अदा करणे बंधनकारक आहे.

४. संस्थेने स्वयंसेवकांना केलेल्या अधिदानाच्या संबंधित बँक खात्यातील तक्ता, बँक पास बुकातील वेतनाच्या नोंदी किंवा प्रती महिन्याच्या २२ तारखेपर्यंत नियुक्त संस्थेने किटक नियंत्रण अधिका-यांना सादर करणे बंधनकारक राहील. तसेच त्याची योग्य ती शहानिशा किटक नियंत्रण अधिकारी यांनी पुढील महिन्याच्या देयकाच्या अधिदानापूर्वी करावी. स्वयंसेवकास केलेल्या अधिदानामध्ये त्रुटी आढळल्यास त्या किटक नियंत्रण अधिकारी दुरुस्त करण्याकरीता संस्थेस कळवून / संस्थेशी पत्रव्यवहार करतील.

५. नियुक्त करण्यात आलेली सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था, स्वयंसेवकांची उपस्थिती दररोज ठेवतील आणि महिना पूर्ण होताच प्रभाव्य अहवालासोबत देयक किटक नियंत्रण अधिका-यांना सादर करतील. सदर देयक व प्रभाव्य अहवाल किटक नियंत्रण अधिकारी पडताळून अधिदानाकरिता लेखा अधिकारी यांना सादर करतील.

६. निवड झालेल्या सहकारी संस्थेला / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेला त्यांच्या सदस्यास म्हणजेच स्वयंसेवकास, कायदयाप्रमाणे आजारपण / अपघात इत्यादीसाठी विमा संरक्षण नियमानुसार प्राप्त करणे बंधनकारक असेल व ही संबंधित संस्थेची सर्वस्वी जबाबदारी असेल.

७. संबंधित सर्व कामगार कायद्यांचे पालन करणे नियुक्त केलेल्या अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना बंधनकारक राहील.

...७...

...७...

८. नियुक्त सहकारी संस्थेच्या / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या सदस्यास ओळखपत्र देण्याची जबाबदारी सदर संस्थेची राहील याबाबत आवश्यक ती खातरजमा किटक नियंत्रण अधिकारी करतील.

९. नियुक्त सहकारी संस्थेच्या / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या सदस्याची वयोमर्यादा १८ वर्षा खालील नसावी.

१०. प्रत्येक महिन्याच्या अखेरीस एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येईल. तसेच एका कॅलेंडर महिन्यातील रविवार व सार्वजनिक सुट्टी हे सुट्टीचे दिवस वगळून कामाचे दिवस २६ दिवसांपेक्षा अधिक होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल. सूचनापत्रातील नमूद कालावधी दरम्यान स्वयंसेवक पुरविलेल्या दिवसांकरिताच अधिदान करण्यात येईल. कार्यादेशात अथवा परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या एकूण दिवसांच्या कालावधीपेक्षा कमी दिवस भरल्यास संस्थांना उर्वरित दिवसांची भरपाई देण्यात येणार नाही किंवा कामाच्या कालावधी मुदत वाढवून देण्यात येणार नाही.

११. बांधकामांच्या ठिकाणी अळीनाशक फवारणी करण्यासाठी फवारणी साधने व सुरक्षा साधने पुरविण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

१२. गणवेश परिधान केलेला, नियुक्त सहकारी संस्थेचा / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेचा स्वयंसेवक सकाळी ७.०० ते २.०० या कालावधीमध्ये ओळखपत्रासहीत, उपकरणे व साधनांसह उपस्थित असणे आवश्यक आहे. त्याच्या जागी इतर कोणाचीही उपस्थिती ग्राहय धरली जाणार नाही.

१३. रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी आवश्यकता असल्यास काम करणे बंधनकारक आहे. किटक नियंत्रण अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार, जादा कामाकरीता महानगरपालिकेतर्फे कोणतेही अतिरिक्त अनुदान / अधिदान मंजुर करण्यात येणार नाही.

१४. नियमित काम करणा-या महानगरपालिकेच्या कर्मचा-याप्रमाणे महापालिकेचे फायदे संस्थेच्या स्वयंसेवकास मिळणार नाहीत तसेच महापालिकेत कोणत्याही परिस्थितीत सामावून घेतले जाणार नाही.

१५. कोणतीही सूचना न देता संस्थेचे काम थांबविण्याचे अधिकार प्रशासनास असतील.

१६. नियुक्त संस्थेस काम बंद करावयाचे असेल तर त्यासंबंधित लेखी सूचना किटक नियंत्रण अधिकारी यांना एक महिना अगोदर द्यावी लागेल. एखादया संस्थेने नियमानुसार काम सोडले तर त्या ठिकाणी प्रतिक्षा यादीवरील पुढील संस्थेची नेमणूक सहायक आयुक्त/परिमंडळीय उपायुक्त यांच्या मंजुरीनुसार करण्यात येईल.

१७. नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेवर, बृहन्मुंबई महानगरपालिकेने नेमून दिलेले काम प्रशासनास समाधानकारक होईल अशा प्रकारे पार पाडणे बंधनकारक राहील.

१८. नियुक्त केलेल्या संस्थांच्या स्वयंसेवकांनी समाधानकारक काम न केल्यास अथवा नियुक्त केलेल्या संस्थेने कराराप्रमाणे दायित्व पार न पाडल्यास सदर सहकारी सेवा संस्थेसोबत केलेला करार कोणतेही कारण न देता खंडीत / रद्द करण्यात येईल आणि या सहकारी सेवा संस्थेची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल व त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार द्वितीय अथवा तृतीय संस्था नियुक्त केली जाईल आणि त्याची संपूर्ण जोखीम व खर्च सदर संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

१९. नियुक्त संस्थेकडून अथवा संस्थेने नेमलेल्या स्वयंसेवकांकडून जर काही गैरवर्तणूक, नुकसान, महापालिकेच्या तसेच आम जनतेच्या मालमत्तेचे अपहरण अथवा हानी झाल्यास त्यास महापालिका प्रशासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील. त्याचप्रमाणे दोषी स्वयंसेवकास त्वरित कामावरुन काढून टाकण्याची व पुढील कारवाई करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची असेल.

...८...



२०. करार कालावधीत नियुक्त संस्थांतर्फे दायित्व निभावणा-या स्वयंसेवकांकडून नेमून दिलेले काम पार पाडत असताना महापालिकेचा तोटा, हानी अथवा नुकसान होणार नाही याची हमी कराराचे दायित्व निभावणा-या नियुक्त संस्थेवर राहील. तथापी महापालिकेस काही हानी, तोटा अथवा नुकसान झाल्यास महापालिकेतर्फे किटक नियंत्रण अधिकारी यांनी परिगणन केलेला नुकसानीचा खर्च हा अंतिम प्रमाण मानण्यात येईल व सदर परिगणन केलेला नुकसानीचा खर्च हा संबंधित नियुक्त संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

२१. स्वयंसेवकांना पुरविण्यात आलेल्या किटकनाशकांचा व संबंधित साधनांचा अपहार, गैरवापर किंवा अशा स्वयंसेवकाने केल्याचे आढळल्यास त्याचे सभासदत्व रद्द करुन त्याला कामावरुन काढून टाकण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची असेल व अशा स्वयंसेवकास भविष्यात कोणत्याही विभागात कोणतेही काम सदर संस्थेमार्फत देण्यात येणार नाही ही खबरदारी संस्था घेईल.

२२. नियुक्त संस्थेच्या सभासदांना प्रचलित किमान वेतन दराने मासिक अधिदान व ४६% लेव्ही याबाबतची जी देणी आहेत ती त्यांनी कामगार कायदयानुसार विहित वेळेत पूर्णपणे अदा करणे गरजेचे आहे. त्याकरिता संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. सदर देणी अपूर्ण अथवा कमी अदा केल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्त संस्थेस कोणतीही पूर्वसूचना न देता काळ्या यादीत टाकण्यात येईल.

२३. नियुक्त संस्थेचे चालक / पदाधिकारी हे महानगरपालिकेच्या कोणत्याही खात्यामध्ये कायम किंवा कंत्राटी पदाचे कर्तव्य पार पाडत असल्याचे आढळल्यास सदर संस्थेला देऊ केलेले काम रद्द करण्यात येईल. सदर संस्थेच्या जागी द्वितीय क्रमांकाच्या संस्थेस काम देण्यात येईल. महानगरपालिका नियमांतर्गत सदर संस्थेचे चालक / पदाधिकारी यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

२४. अळीनाशक फवारणी ही सेवा २४३W अन्वये 'निव्वळ सेवा' (Pure Services) असल्याने त्यांना वस्तू व सेवाकर लागू नाही. तथापि शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या वस्तू व सेवाकरासंदर्भातील निदेशानुसार अटी व शर्तींची पूर्तता करणे नियुक्त केलेल्या सहकारी संस्थेला / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेला बंधनकारक राहील.

२५. नियुक्त संस्थेने सदर कामांबाबतच्या सूचनेतील नमूद अटी व शर्ती मान्य असल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर देणे क्रमप्राप्त असेल.

**फ) <u>दंडात्मक कारवाई</u> :**

१. संस्थेचा सभासद/स्वयंसेवक सकाळी ७.०० वाजता कामावर वेळेवर हजर झाल्यास त्यास काम देण्यात येईल अन्यथा सहकारी संस्थेने त्याच्या जागेवर बदली स्वयंसेवकांमधून अन्य स्वयंसेवक उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील, अन्यथा सहकारी संस्थेस प्रतिदिनी प्रति स्वयंसेवक रु.१५०/- इतका दंड आकारण्यात येईल.

२. नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेमार्फत पुरविण्यात आलेल्या स्वयंसेवकांना कोणत्याही प्रकारे मोर्चा, आंदोलन, संप, दंगलीमध्ये तसेच राजकीय, इत्यादी कारणासाठी सहभागी होता येणार नाही. सदर संस्थेचे स्वयंसेवक अशाप्रकारे सहभागी झाल्याचे आढळल्यास त्यांच्या एक दिवसाच अधिदानाच्या सात पट रक्कम दंड म्हणून वसुल केली जाईल. त्याचप्रमाणे संबंधित संस्थेस काळया यादीत टाकण्यात येईल व त्यांना देऊ केलेले काम रद्द करण्यात येईल. तसेच सदर संस्थेचे चालक / पदाधिकारी यांच्या नावे अथवा त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावे कोणतीही संस्था असल्यास अथवा नवीन संस्था सुरु केल्यास अशा संस्थेला

महानगरपालिकेतर्फे काम / कंत्राट देण्यात येणार नाही व दिले असल्यास त्वरित रद्द करण्यात येईल. सदर संस्थेच्या जागी द्वितीय क्रमांकाच्या संस्थेस काम देण्यात येईल.

३. नेमणुक झालेल्या संस्थेने सर्व स्वयंसेवकांना मॉप, फेस मास्क, गॅलव्हनाईज्ड बादली, सेफ्टी शूज, हेल्मेट गणवेष पुरविणे बंधनकारक असेल व न पुरविल्यास खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल

४. स्वयंसेवकाचे अधिदान नियुक्त सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने प्रत्येक महिन्याच्या





१० तारखेपर्यंत अदा केले नाही तर रु. १०००/- इतका दंड संस्थेकडून आकारण्यात येईल व असे तीन वेळा घडल्यास सदर संस्थेस ३ वर्षाकरिता काळया यादीत टाकणे व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे, इत्यादी शिक्षा देण्याची शिफारस संबंधित वरिष्ठांकडे करण्यात येईल व त्यानुसार पुढील कार्यालयीनकारवाईकरण्यातयेईल.

| अन्. क्र. | उपकरणे व सुरक्षा साधने | दंड (रू.) प्रति स्वयंसेवक प्रति दिन |
|---|---|---|
| १ | मॉप | २५/- |
| २ | फेस मास्क | २५/- |
| ३ | गॅलव्हनाईज्ड बादली | ५०/- |
| ४ | सेफ्टी शूज | ५०/- |
| ५ | हेल्मेट | ५०/- |
| ६ | गणवेश | १००/- |

५. नेमणुक झालेल्या संस्थांनी सर्व स्वयंसेवकांना मासिक अधिदान प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत बँकेच्या धनादेश / ECS /RTGS / NEFT द्वारे न केल्यास सदर संस्थेला रू.२०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

६. नेमणुक झालेल्या संस्थांनी सर्व स्वयंसेवकांना ओळखपत्र न दिल्यास प्रत्येक स्वयंसेवकामागे रु.५०/- इतका दंड आकारण्यात येईल.

*** कामाची व्याप्ती** –

१. संपूर्ण बी विभाग क्षेत्रात बांधकामे व इतर परिसर इत्यादि ठिकाणी डास अळीनाशक फवारणी करणे.

२. दैनंदिन कामांबरोबर डास उत्पत्तीस्थाने नष्ट करणे अशा प्रकारे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी आणि झोपडपट्टीसदृश्य ठिकाणी मलेरिया, डेंगी नियंत्रण विशेष कार्यक्रम राबविणे.

**खर्च व आर्थिक तरतूद**

सद्यःस्थितीत प्रमुख कामगार अधिकारी यांच्या सद्यःस्थितीत प्रमुख कामगार अधिकारी यांच्या परिपत्रक क्र.प्रकाअ/७ दि.१३.०९.२०१९ अन्वये किमान वेतन दर रु.६२५.३८ प्रतिदिन प्रती स्वयंसेवक असा आहे प्रति स्वयंसेवक किमान वेतन दर अधिक ४६% लेव्ही असा आहे. सदर दर हा कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून ७ महिन्यांसाठी व (पावसाळी मोसमातील जून ते नोव्हेंबर या ६ महिन्याकरिता या कालावधीसाठी आहे. त्यानुसार उपरोक्त कामाचा एकूण खर्च खालीलप्रमाणे आहे :-

| अनु. क्र | कामाचे स्वरुप | कालावधी | स्वयंसेवकांची संख्या | रक्कम (रु.) (४६% लेव्हीसहीत) |
|---|---|---|---|---|
| १ | किटक नियंत्रण अधिकारी 'बी' विभागातील सर्व बांधकामांच्या ठिकाणी अळीनाशक फवारणी | **७ महिने** (१६८ दिवस) | ५ | ७,६६,९६६.०३ |
| २ | झोपडपट्टी आणि झोपडपट्टीसदृश्य ठिकाणी मलेरिया, डेंगी नियंत्रण विशेष कार्यक्रम राबविणे | ६ महिने (जून ते नोव्हेंबर) (१४५ दिवस) | १० | १३,२३,९२९.४६ |
| | **एकूण** | | | **२०,९०,८९५.४९** |



...१०...

कंत्राटाचा **एकूण खर्च रु. २०,९०,८९५.४९/- (अक्षरी रुपये- वीस लाख नव्वद हजार आठशे पंच्यांन्नव आणि एकोंणपन्नास फक्त)** असा आहे. सदर खर्च किटक नियंत्रण अधिकारी 'बी' विभागाच्या सन २०२०-२१ च्या खालील अर्थसंकल्पीय शिर्षातून करण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे (प्रशासकिय मंजूरीची प्रत पृष्ठ क्र.प ---- ते प ---- येथे जोडली आहे).

**आर्थिक वर्ष सन २०२०-२१**

फंड कोड : १२
कॉस्ट सेंटर नाव: एच.ओ.
कॉस्ट सेंटर कोड: (४०२०४७००००)
डिपार्टमेंट कोड : ४७
फंक्शन कोड : ३३२०२००००००
फंक्शनचे नाव : उपयोजित बाहयसेवांवरील खर्च
अकांऊट कोड : २२०८००४००
एकूण तरतूद :
खर्च झालेली रक्कम :
उपलब्ध तरतूद :

सदर तरतूद सन २०२०-२०२१ करिता प्रस्ताविण्यात आलेली आहे.

**अर्जाची उपलब्धता व परिशिष्टः**

१. सूचनेच्या अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्र संकेत स्थळावरुन डाऊनलोड करण्यासाठी 'बी' विभागाच्या एकूण खर्चाच्या रक्कमेनुसार विहीत अनुज्ञेय रक्कम अधिक ५% (२.५% SGST + २.५% (५ वस्तू व सेवा कर किंवा जर वस्तू व सेवा करासंदर्भात शासनाचे परिपत्रक आयास त्याप्रमाणे विहित रक्कम नागरी सुविधा केंद्रात भरल्यानंतर प्राप्त होईल.

२. सार्वजनिक जाहिरातीव्दारे वर्तमानपत्रात प्रस्तुत करावयाच्या सूचनेबाबतच्या अर्जासोबत जोडावयाची आवश्यक परिशिष्टे पृष्ट क्र.प----- ते प----- वर जोडली आहेत. तसेच मनपा संकेत स्थळावर प्रस्तुत करावयाची सूचना पृष्ट क्र.प----- ते प----- वर जोडलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सहायक आयुक्त 'बी' विभाग / उपायुक्त (परि - १)/ अति. आयुक्त (श खालील बाबींस मंजूरी मिळावी ही विनंती.

१. किटक नियंत्रण अधिकारी बी विभाग येथे बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता सदर संस्थेची कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून ७ महिन्यांसाठी व (पावसाळी मोसमातील जून ते नोव्हेंबर) या ६ महिन्याकरिता कालावधीसाठी परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्यानुसार बी विभागात अ स्वयंसेवक उपलब्ध करुन घेण्यासाठी आणि पावसाळयात पारेषणकाळात जून ते ऑक्टोबर अशा एकूण पाच महिन्यांच्या कालावधीकरिता मलेरिया / डेंगी नियंत्रणाकरिता परिशिष्ट 'अ'मध्ये दर्शविल्यानुसार बी विभागात आवश्यक अतिरिक्त स्वयंसेवक उपलब्ध करुन घेण्यासाठी एकत्रित एकत्रित सूचनेद्वारे अर्ज मागविण्याकरिता.

२. सूचनेच्या अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्र संकेत स्थळावरुन डाऊनलोड करण्यासाठी 'बी' विभागाच्या एकूण खर्चाच्या रकमेनुसार अनुज्ञेय रक्कम अधिक वस्तू व सेवा करासहित रक्कम घेण्याकरिता. ...११...

...११...

३. उपरोल्लेखित सूचनेद्वारे मागविण्यात आलेल्या पात्र अर्जांमधून सोडत पध्दतीने प्रथम, व्दितीय व तृ अशी संस्थांची निवड करुन नियुक्ती करण्याकरिता.

४ सोडतीनुसार नियुक्ती करण्यात आलेल्या संस्थेला शासनाच्या धोरणानुसार व प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये किमान वेतन दर ४६ लेव्ही प्रतिपूर्तीसापेक्ष यानुसार अधिदान करण्याकरिता.

५. नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेने केलेल्या कामाचा खर्च किटक नियंत्रण अधिकारी 'बी' विभागाच्या उपरोक्त नमूद केलेल्या अर्थसंकल्पीय शिर्षातील उपयोजित बाहयसेवांवरील खर्च या सेवाशिर्षाच्या लेखासंकेताक २२०८००४०० मधून करण्याकरिता.

६.	नियुक्त करण्यात आलेल्या सस्थेशी कंत्राट करार करण्यास स्थायी समितीच्याएस मंजूरीसाठी आवश्यक ते मसुदा पत्र सादर करण्याकरिता.

७.	संस्था कार्यरत असताना कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास वा इतर कोणत्याही प्रकारचे देय देण्याचे झाल्यास एकूण मंजूर रक्कमेच्या १०% रकमेची अतिरिक्त मंजूरी मिळण्याकरिता.

८.	लोकसत्ता (मराठी), यशोभूमी (हिंदी), फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी मुंबई एडीशन) व मुंबई समाचार (गुजराथी) या वर्तमानपत्रात उपरोक्त सूचनेची जाहिरात देण्याकरिता.

९.	सदर सूचनेच्या जाहिरातीचा खर्च जनसंपर्क अधिकारी यांच्या योग्य त्या अनुदानातील आर्थिक सेवाशिर्षातून भागविण्याकरिता.

सहाय्यक आयुक्त यांनी सदर सूचनेच्या प्रस्तावाबाबत आपले अभिप्राय देऊन प्रस्ताव लेखा अधिकारी 'बी' विभाग यांच्याकडे पडताळणीकरिता पाठविण्यात यावा ही विनंती.

लेखा अधिकारी 'बी' विभाग यांनी सदर प्रस्तावाची पडताळणी करुन अभिप्रायासह उप आयुक्त परिमंडळ- १ यांच्याकडे मंजूरीकरिता सादर करावा ही विनंती.

**किटक नियंत्रण अधिकारी**

**'बी' विभाग.**

**<u>सहायक आयुक्त बी विभाग</u>**

**महोदय**

**<u>लेखा अधिकारी बी विभाग</u>**

**महोदय**

**<u>उप आयुक्त ( परिमंडळ- १)</u>**

**महोदय**

**उप पमूख् लेखापाल<u>(परिमंडळ-०१)</u>**

**महोदय**

...१२...



## WORKING DAYS CALCULATION

| Month | Period | No. of Holidays (Sundays & Labour Holidays) | | | Date of Break | Actual Working Day |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Sunday within Period | Labour Holidays | Date & Labour Holidays | | |
| April 20 | 01.04.2020 to 30.4.2020 | 04 | 02 | 02.04.2020 Ram Navami & 14.04.2020 Dr. Ambedkar Jayanti | 30.4.2020 | 23 |
| May 20 | 01.05.2020 to 31.05.2020 | 05 | 03 | 01.05.2020 Kamgar Day , 07.05.2020 Buddha Pornima & 25.5.2020 Ramjan Eid | 30.5.2020 | 22 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| June 20 | 01.06.2020 to 30.06.2020 | 04 | 0 | 0 | 30.06.2020 | 25 |
| July 20 | 01.07.2020 to 31.07.2020 | 04 | 0 | 0 | 31.06.2020 | 26 |
| August 20 | 01.08.2020 to 31.08.2020 | 05 | 02 | 15.07.2020 Independay & 22.07.2020 Ganesh Chaturthi | 31.07.2020 | 23 |
| Sep. 20 | 01.09.2020 to 30.09.2020 | 04 | 0 | 0 | 30.09.2020 | 25 |
| Oct 20 | 01.10.2020 to 29.10.2020 | 4 | 01 | 02.10.2020 Gandhi Jayanti | | 24 |
| | | | | | **Total Days** | **168** |

**किटक नियंत्रण अधिकारी**

**बी विभाग**

...१३...

...१३...

## WORKING DAYS CALCULATION

| Month | Period | No. of Holidays (Sundays & Labour Holidays) | | | Date of Break | Actual Working Day |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Sunday within Period | Labour Holidays | Date & Labour Holidays | | |
| June 20 | 01.06.2020 to 30.06.2020 | 04 | 0 | 0 | 30.06.2020 | 25 |
| July 20 | 01.07.2020 to 31.07.2020 | 04 | 0 | 0 | 31.06.2020 | 26 |
| August 20 | 01.08.2020 to 31.08.2020 | 05 | 02 | 15.07.2020 Independay & 22.07.2020 Ganesh Chaturthi | 31.07.2020 | 23 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sep. 20 | 01.09.2020 to 30.09.2020 | 04 | 0 | 0 | 30.09.2020 | 25 |
| Oct 20 | 01.10.2020 to 31.10.2020 | 04 | 02 | 02.10.2020 Gandhi Jayanti & 30.10.2020 Eid A Milad | 31.10.2020 | 24 |
| Nov 20 | 01.11.2020 to 28.11.2020 | 04 | 02 | 14.11.2020 Laxmi pujan & 16.11.2020 Balipradа | | 22 |
| | | | | **Total Days** | | **145** |

**किटक नियंत्रण अधिकारी**
**बी विभाग**